खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

॥ आजचा सुविचार ॥
एखादा देश आणि त्याची नैतिक मुल्ये किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.
– महात्मा गांधी

वर्ष : ०६ | अंक : २९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१२ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## कळंबोलीत नाल्यात अनोळखी मृतदेह आढळल्याने खळबळ...



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.११, पनवेल (नवी मुंबई) :** कळंबोली येथील सुधागड हायस्कूल परिसरातील सेक्टर १-ई भागात असलेल्या नाल्यात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शुक्रवारी ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास नाल्यात मृतदेह आढळून आल्यानंतर त्यांनी तातडीने संबंधित यंत्रणेला याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर मृतदेह बाहेर काढण्याची तसेच ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, पोलिसांकडून त्याची ओळख पटविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. मृत व्यक्ती स्थानिक रहिवासी आहे की बाहेरील भागातील, याबाबतही सध्या कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, संबंधित व्यक्तीचा मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. हा अपघाती मृत्यू आहे की मृत्यूमागे अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. मृतदेहाच्या वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

घटनेची माहिती परिसरात पसरताच नाल्याजवळ नागरिकांनी गर्दी केली होती. त्यामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी आवश्यक ती कार्यवाही करत नागरिकांना दूर केले.

मृत व्यक्तीची ओळख पटविणे, मृत्यूचे नेमके कारण शोधणे तसेच घटनेमागील परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे. अधिकृत तपासातूनच या घटनेचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## यंदा राजकीय नेत्यांचे बडगे हरवले, पण सामाजिक प्रश्नांवर प्रहार

### नागपूरच्या ऐतिहासिक मारबत मिरवणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नागपूर :** नागपूरच्या ऐतिहासिक मारबत मिरवणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी राजकीय नेते, राजकीय पक्ष आणि सरकारच्या निर्णयांवर बडग्यांच्या माध्यमातून होणारे बोचरे प्रहार. त्यामुळे मिरवणुकीत यंदा कोणत्या नेत्यावर किंवा कोणत्या राजकीय निर्णयावर बडगा निघणार, याची नागपूरकरांना उत्सुकता असते. मात्र, यंदाच्या मारबत मिरवणुकीत राजकीय नेत्यांत बडगेच हरवलेले दिसले. कोणत्याही राजकीय नेत्यावर, पक्षावर किंवा सरकारच्या निर्णयावर थेट टीका करणारा ठळक राजकीय बडगा दिसून आला नाही. त्यामुळे यंदाच्या बडग्यांनी राजकारणाऐवजी सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडे आपला मोर्चा वळवल्याचे चित्र दिसले.

मारबत उत्सव म्हटला की बडग्यांची चर्चा होणारच. वर्षभरात देश-विदेशात घडलेल्या घटना आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रश्नांना बडग्यांच्या माध्यमातून प्रतीकात्मक रूप दिले जाते. जनतेच्या मनातील असंतोष, संताप आणि प्रश्न मांडण्याचे प्रभावी माध्यम मानले जाते. वर्षभरात देशात आणि जगात घडलेल्या अशा घटना, ज्यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनावर होतो, त्यावर बडग्यांच्या माध्यमातून मार्मिक भाष्य केले जाते. त्यामुळे मारबत मिरवणूक ही नागपूरच्या लोकभावनेचा आरसा ठरते. सूचक फलक, उपरोधिक घोषवाक्ये आणि प्रतिकात्मक पुतळ्यांमधून संबंधित विषयावर भाष्य केले जाते. त्यामुळे बडगे हे नागपूरच्या लोकभावनेचे






प्रभावी व्यासपीठ मानले जाते.

**यंदा राजकीय नेते टार्गेटवर नाहीत!**

मारबत उत्सवातील बडग्यांची परंपरा पाहता दरवर्षी एखादा राजकीय नेता, पक्ष किंवा सरकारच्या निर्णयावर थेट अथवा अप्रत्यक्षपणे टोला लगावणारे बडगे हमखास चर्चेत असतात. त्यामुळे यंदा कोणत्या नेत्यावर बडगा निघणार, कोणत्या निर्णयाची खिल्ली उडवली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले होते. मात्र, यंदा राजकारण्यांना थेट लक्ष्य करणारे बडगे तुलनेने दिसले नाहीत. राजकीय व्यक्तींपेक्षा समाजातील प्रश्न आणि देश-विदेशातील घडामोडींना बडग्यांमधून अधिक प्राधान्य देण्यात आले.

**पाकिस्तानचे फिल्ड मार्शल आणि लष्करप्रमुख सय्यद आसिम मुनीरवर 'फेल्ड मार्शल'चा टोला**

यंदाच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे फिल्ड मार्शल आणि लष्करप्रमुख सय्यद आसिम मुनीर यांच्यावरही बडग्याच्या माध्यमातून जोरदार टोला लगावण्यात आला. मस्कासाथ येथील छत्रपती शिवाजी पार्क बडग्या उत्सव समितीने पाकिस्तानचे लष्करप्रमुख फिल्ड मार्शल सय्यद आसिम मुनीर यांच्यावर टीका करणारा बडग्या तयार केला आहे. या बडग्यावर 'फेल्ड मार्शल' आणि 'फेल कमाल, बलूचिस्तान में बुरा हाल' अशा उपरोधिक घोषणा करण्यात आल्या आहेत. पाकिस्तानच्या लष्करी नेतृत्वावर आणि बलुचिस्तानमधील परिस्थितीवर या माध्यमातून भाष्य करण्यात आले. यासोबतच पाकिस्तानचा निषेध करणारे इतर बडगेही मिरवणुकीत सहभागी झाले.

**'निळा ड्रम'ने मेरठ हत्याकांडाची आठवण...**

यंदाच्या मिरवणुकीतील विशेष आकर्षण ठरलेल्या बडग्यांमध्ये निळा ड्रमचा समावेश आहे. मार्च २०२५ मध्ये मेरठ येथे पत्नीने प्रियकराच्या मदतीने मर्चंट नेव्हीतील पतीची हत्या करून मृतदेहाचे तुकडे सिमेंटच्या निळ्या ड्रममध्ये लपविल्याची घटना समोर आली होती. या धक्कादायक हत्याकांडातून वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा निषेध करण्याचा प्रयत्न या प्रतिकात्मक बडग्यातून करण्यात आला आहे. त्यामुळे हा बडगा सामाजिक संदेश देणारा ठरला.

**'मोबाईलवाली बुवा'पासून महागाई-बेरोजगारीपर्यंत...**

मोबाईलच्या अतिवापरावर आणि विशेषतः लहान मुलांच्या हातात वाढत्या मोबाईल वापरावर भाष्य करणारा 'मोबाईलवाली बुवा' हा बडगाही आकर्षण ठरला. डिजिटल साधनांचा वाढता वापर, त्याचा दुरुपयोग आणि बदलती सामाजिक सवय याकडे या बडग्याने लक्ष वेधले. याशिवाय वाढती महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या प्रश्नांवरही बडगे काढण्यात आले.

**इंग्रजांच्या काळापासूनची परंपरा**

बडग्यांची परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळाशी जोडली जाते. इंग्रजांच्या राजवटीत थेट विरोध व्यक्त करण्यावर मर्यादा असताना प्रतीकात्मक पुतळे आणि उपहासात्मक बडग्यांच्या माध्यमातून जनतेचा रोष व्यक्त केला जात असे. नागपूरच्या भोसले राजघराण्यातील बाकाबाई यांनी इंग्रजांशी हातमिळवणी केल्याच्या निषेधातून काळी मारबत आणि त्यासोबत बडग्यांची परंपरा सुरू झाल्याचे सांगितले जाते.

कालानुसार बडग्यांचे स्वरूप बदलले, मात्र व्यवस्थेतील त्रुटी, सामाजिक प्रश्न आणि जनतेच्या भावनांना वाचा फोडण्याची भूमिका कायम राहिली. दरवर्षी राजकीय टोमण्यांमुळे चर्चेत राहणाऱ्या बडग्यांनी यंदा मात्र राजकीय नेत्यांना मोठ्या प्रमाणात वगळून जनतेच्या दैनंदिन प्रश्नांना आणि देश-विदेशातील घडामोडींना लक्ष्य केले. त्यामुळे 'राजकीय नेत्यांत बडगे हरवलेले' असले तरी जनतेच्या मनातील प्रश्न मांडणारी बडग्यांची परंपरा मात्र यंदाही कायम राहिली.

## गणेशोत्सव शांततेत साजरा करा : अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.११, पालम (परभणी) :** यंदाचा गणेशोत्सव कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा. गणेश मंडळांनी प्रशासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक परवाना घेऊनच गणेशमूर्तीची स्थापना करावी. तसेच उत्सवादरम्यान मंडळाच्या ठिकाणी स्वयंसेवकांची नियुक्ती करून परिसरावर योग्य देखरेख ठेवावी, असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांनी केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुरुवार, दि.११ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालयात पालम पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले बोलत होते. यावेळी चिखले म्हणाले की, दि.१४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला प्रारंभ होत आहे. गणेश मंडळांनी आवश्यक परवाना घेऊनच गणेशमूर्तीची स्थापना करावी. मंडळांनी स्वयंसेवकांची नियुक्ती करून गणेश मंडप व परिसरावर लक्ष ठेवावे. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. मिरवणुका डीजेमुक्त करण्यासाठी सर्व गणेश मंडळांनी पुढाकार घ्यावा. तसेच गुलालाऐवजी फुलांचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा. उत्सवादरम्यान पोलीस पाटील व गावातील लोकप्रतिनिधींनी कोणतीही अनुचित बाब निदर्शनास आल्यास तत्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीचे प्रास्ताविक पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांनी केले. त्यांनी शहरासह तालुक्यातील गणेश मंडळांना विविध सूचना केल्या. प्रत्येक गणेश मंडळाने गणपतीची स्थापना करताना मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी आवश्यक खबरदारी घेता येईल. मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी उत्सवादरम्यान विशेष दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी कुंदन वाघमारे, नगरपंचायत मुख्याधिकारी युवराज पोळ, नायब तहसीलदार तेलभरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंजुषा मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक लोखंडे, महावितरणचे सहाय्यक अभियंता भागवत घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या दरम्यान, बैठकीत शहरातील तसेच तालुक्यातील सुजाण नागरिकांनी प्रशासनासमोर विविध सूचना मांडल्या. सामाजिक कार्यकर्ते गजानन देशमुख यांनी गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील अडथळ्यांचा मुद्दा उपस्थित केला. शहरातील ज्या रस्त्यांवरून गणेश विसर्जनाची मिरवणूक जाते, त्या रस्त्यांवर सध्या वाळू, मातीचे ढिगारे तसेच बांधकाम साहित्य पडून आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीसह वाहतुकीलाही अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.त्यामुळे नगरपंचायतीने गणेश विसर्जन मिरवणुकीपूर्वी संबंधित रस्त्यांवरील वाळू-मातीचे ढिगारे तसेच बांधकाम साहित्य हटवून रस्ते स्वच्छ व वाहतुकीसाठी मोकळे करावेत, अशी मागणी गजानन देशमुख यांनी केली. यावेळी ॲड. रामजी मणियार, निवृत्ती हत्तीआंबिरे, वैजनाथ हत्तीआंबेरे यांच्यासह उपस्थित नागरिकांनीही प्रशासनासमोर विविध मते व सूचना मांडल्या.

बैठकीचे सूत्रसंचालन पदुदेवा जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी गोरे यांनी केले. बैठकीला शहर व तालुक्यातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, पोलीस कर्मचारी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. भोंगळे यांच्या आग्रही पाठपुराव्याचे फलित; बैलपोळ्याच्या शुभमुहूर्तावर शासन निर्णय जारी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, राजूरा (चंद्रपूर) :** उन्हातान्हात शेतात राबणाऱ्या बळीराजाच्या सुरक्षेचा मुद्दा विधिमंडळात अत्यंत प्रभावीपणे मांडणारे राजुरा मतदारसंघाचे अभ्यासू आ. देवराव भोंगळे यांच्या आग्रही भूमिकेला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. राज्य सरकारने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेचा ऐतिहासिक विस्तार करत त्यामध्ये उष्माघात आणि भूमिहीन शेतमजुरांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

बळीराजाच्या जिवाभावाच्या सणादिवशी म्हणजेच बैलपोळ्याच्या शुभमुहूर्तावर कृषी विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केल्याने संपूर्ण राज्यातील शेतकरी व कष्टकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

पावसाळी अधिवेशनात २३ जून रोजी विधानसभेत नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होत आ. देवराव भोंगळे यांनी उष्माघातामुळे होणाऱ्या अपघाती मृत्यूचा या योजनेत समावेश करण्याची आणि यातील कायदेशीर त्रुटी दूर करण्याची संवेदनशील मागणी लावून धरली होती. कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सभागृहातच या मागणीची दखल घेण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार कृषी विभागाने (दि. १०) सप्टेंबर रोजी शासन निर्णय जारी करून योजनेच्या सुधारित स्वरूपास मंजुरी प्रदान केली आहे.



या नवीन शासन निर्णयानुसार आता शेतात काम करताना उष्माघाताने मृत्यू झाल्यास २ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मिळणार आहे. याशिवाय, ही योजना पूर्वी केवळ ७/१२ धारक खातेदारांपुरती मर्यादित होती; परंतु आ. देवराव भोंगळे यांच्या मागणीमुळे आता श-डहअ‍ॅरा नोंदणीकृत भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमांतर्गत नोंदणीकृत महिला शेतकऱ्यांनाही यात समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच, कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीऐवजी १० ते ७५ वयोगटातील आई-वडील, पती-पत्नी आणि मुलांसह सर्व सदस्यांना हे आर्थिक सुरक्षा कवच लागू करण्यात आले आहे.

ही सुधारित योजना १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या ५ वर्षांच्या कालावधीसाठी लागू करण्यात आली असून, यासाठी वार्षिक २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. योजनेंतर्गत अपघाती मृत्यू किंवा दोन अवयव निकामी झाल्यास २ लाख रुपये, तर एक अवयव निकामी झाल्यास १ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा केले जाईल. सर्पदंश, वीज पडणे, विषबाधा, जनावरांचा हल्ला आणि उष्माघातासह एकूण १४ प्रकारच्या अपघातांचा यात समावेश आहे.

घटनेनंतर ८ दिवसांत चौकशी अहवाल सादर करून आणि अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत तहसीलदार यांची समिती लाभाचा निर्णय घेईल, अशी जलद कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. आमदार देवराव भोंगळे यांच्या या दूरदृष्टीमुळे संपूर्ण राज्यातील लाखो शेतकरी व भूमिहीन मजुरांना भक्कम सामाजिक व आर्थिक आधार मिळाला असून, बैलपोळ्याच्या दिवशी मिळालेल्या या मोठ्या दिलाशाबद्दल राज्यभरातून आमदार देवराव भोंगळे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## दिवसाढवळ्या थरार! मेडिकलमध्ये घुसून २२ वर्षीय तरुणाला संपवलं

**दि.११, छत्रपती संभाजीनगर :** शहर परिसरातील हर्सूल येथील 'लाईफ लाईन' मेडिकलमध्ये घुसून टोळक्याने २२ वर्षीय मेडिकल चालकाचा चाकूने पोटात वार करून निर्घृण खून केल्याची अत्यंत खळबळजनक घटना घडली आहे. शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर) दुपारी १ वाजेच्या सुमारास कोळठाणवाडी रोडवरील करीमनगर भागात ही रक्ताळलेली घटना घडली. घटनेनंतर आरोपी तात्काळ पसार झाले असून, या धक्कादायक प्रकारामुळे हर्सूल परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या प्राणघातक हल्ल्यात शेख फैजल



अब्दुल कादर (वय २२, रा. शरीक कॉलनी, किराडपुरा) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. फैजल याने डी-फार्मसीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर दोन वर्षांपूर्वी करीमनगर येथे स्वतःचे मेडिकल सुरू केले होते. त्याचे वडील सुरक्षारक्षक म्हणून काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. शुक्रवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास फैजल नेहमीप्रमाणे छत्रपती संभाजीनगर येथील आपल्या मेडिकलमध्ये बसलेला होता. त्यावेळी अचानक काही तरुण तेथे आले आणि त्यांनी फैजलसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. वाद विकोपाला गेल्यानंतर टोळक्यातील एकाने धारदार चाकू काढून थेट फैजलच्या पोटात वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या फैजलला सोडून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

**खुनाचे ठोस कारण अस्पष्ट; पोलिसांचा तपास सुरू**

हा खून कोणी आणि नेमक्या कोणत्या कारणातून केला, याचे ठोस कारण अद्याप समजू शकलेले नाही. घटनेची माहिती मिळताच हर्सूल पोलीस आणि फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांनी संशयित आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली असून, पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी अधिक तपास करत आहेत.




## तेलाचं गणित, पैशांची वाट

येत्या १२ आणि १३ सप्टेंबरला भारत मंडपममध्ये ब्रिक्सचे नेते जमतील, तेव्हा दिल्लीत होणारी ती केवळ आणखी एक शिखर परिषद नसेल. गेल्या सहा महिन्यांत जगाची घडी अशी विस्कटली आहे की भारताला या मंचावर नेमकं काय हवं आहे, हा प्रश्न आता कागदावरचा राहिलेला नाही; तो थेट अर्थसंकल्प, महागाई आणि रोजगाराचा प्रश्न झाला आहे. म्हणून यंदा भाषणांपेक्षा भारताच्या हितसंबंधांवर बोलणं अधिक योग्य ठरेल.

पहिलं आणि सर्वांत मोठं हित म्हणजे ऊर्जा. २८ फेब्रुवारीला इराणविरुद्धचं युद्ध सुरू झालं आणि होमुझची सामुद्रधुनी जवळपास बंद पडली. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ९० टक्के तेल आयात करतो; त्यातील जवळपास ४० टक्के तेल, ६० टक्के एलएनजी आणि ९० टक्के एलपीजी नेमकी याच वाटेने येते. परिणाम आकड्यांतून दिसतात. एप्रिल-जून तिमाहीत भारताचं कच्च्या तेलाचं आयात बिल ६१ टक्क्यांनी वाढून जवळपास ५० अब्ज डॉलरवर गेलं, आणि हे आयातीचं प्रमाण प्रत्यक्षात घटलेलं असतानाही घडलं. रास तनुरा ते भारत या मार्गावरचं मालवाहतूक भाडं ४०० टक्क्यांहून अधिक वाढलं. होर्मुझमधून एका फेरीसाठीचा युद्ध-विमा अडीच लाख डॉलरवरून एक कोटी डॉलरपर्यंत गेला. मार्च ते ऑगस्ट या सहा महिन्यांत भारतावर सुमारे २२ अब्ज डॉलरचा अतिरिक्त इंधन-बोजा पडला. रुपया ९६ च्या पलीकडे घसरला. हे सगळं शेवटी सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरात आणि व्यापारतुटीत उतरतं. अशा वेळी ज्या मंचावर रशिया, इराण, सौदी अरेबियाचे शेजारी, यूएई आणि इजिप्त एकाच टेबलावर बसतात, तो मंच भारतासाठी केवळ चैन नाही तर गरज ठरते. भारताकडे अडीचशे दशलक्ष बॅरलहून अधिक साठा असल्याचं सरकार सांगतं; पण साठा हा उपाय नाही, तो केवळ वेळ विकत घेतो. खरा उपाय म्हणजे पुरवठादारांचं आणि वाहतूक-मार्गांचं वैविध्य, आणि ते ब्रिक्सच्या टेबलावर मिळू शकतं.

भारताच्या ऊर्जा-सुरक्षेचा प्रश्न किती जिवंत आहे, हे गेल्या आठवड्यातील घडामोडींवरून दिसतं. अमेरिकेने लारक बेटावर हल्ला केला, इराणने जॉर्डनमधील तळांवर प्रत्युत्तर दिलं आणि ब्रेंट कच्चं तेल पुन्हा ९० डॉलरच्या पुढे गेलं. होर्मुझमधून युद्धापूर्वी दररोज सुमारे १३० जहाजं जात; आता आठवड्याला शंभरच्या आसपास जातात.

भारतासाठी दुसरं हित आहे, पेमेंट आणि व्यापाराची पर्यायी यंत्रणा. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकिर्दीने एक गोष्ट स्पष्ट केली आहे, व्यापार आता केवळ व्यापार राहिलेला नाही, तो दबावाचं साधन झाला आहे. गेल्या ऑगस्टमध्ये भारतीय मालावर ५० टक्के शुल्क लागलं -आशियात सर्वाधिक- ज्यात रशियन तेलखरेदीशी जोडलेला दंडात्मक हिस्सा होता. फेब्रुवारीत नेत्यांच्या पातळीवरील चर्चेनंतर ते १८ टक्क्यांवर आलं, पण तपशिलांवरचे वाद आणि अंमलबजावणीतील अनिश्चितता कायम आहे. एकाच वर्षात दबाव आणि सौदा दोन्ही अनुभवल्यानंतर भारताला मिळालेला धडा स्पष्ट आहे, एकाच वाटेवर अवलंबून राहणं धोक्याचं. म्हणूनच भारत ब्रिक्समध्ये राष्ट्रीय जलद-देयक प्रणाली आणि डिजिटल चलनं जोडणाऱ्या 'पेमेंट ब्रिज'चा आग्रह धरेल; यूपीआय, ब्राझीलचं पिक्स, ई-रुपया. उद्देश डॉलर पाडणं नाही; डॉलरवरचं अवलंबित्व कमी करून व्यवहारांचा खर्च आणि निर्बंधांचा धोका घटवणं आहे. समान ब्रिक्स चलनाची कल्पना भारताने सातत्याने नाकारली आहे आणि 'डॉलर कमकुवत करण्यात आम्हाला रस नाही' हे भारताने जाहीरपणे सांगितलं आहे. कारण अमेरिका आजही भारताची सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ आहे. भारताला भांडण नको आहे; पर्याय हवे आहेत.

तिसरं हित आहे, रशियाशी असलेला दुवा टिकवणं. युक्रेन युद्ध पाचव्या वर्षात गेलं आहे. जीनिव्हातील चर्चा फिसकटल्या, मॉस्कोने आपल्या अटी बदललेल्या नाहीत, आणि सप्टेंबरमध्ये पुन्हा चर्चेची शक्यता वर्तवली जात असली तरी तोडगा दूरच आहे. या पार्श्वभूमीवर रशिया अजूनही भारताचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार आहे आणि संरक्षण सामग्रीसाठीही महत्त्वाचा आहे. 'रशियन तेल खरेदीसाठी आम्हाला कोणाच्या परवानगीची गरज नाही,' ही भारताची अधिकृत भूमिका. ब्रिक्स हा असा एकमेव मोठा मंच आहे, जिथे भारत रशियाशी उघडपणे, सन्मानाने आणि नियमितपणे संवाद ठेवू शकतो, आणि तेही पाश्चात्त्य भागीदारीशी तडजोड न करता. पुतिन आणि शी जिनपिंग दोघेही दिल्लीत येत असताना, भारताची ही सोय किती मोलाची आहे, हे वेगळं सांगायला नको.


**– डॉ. मनीष दाभाडे**

# गणेशोत्सवाला-प्रवासी वेठीला

गणेशोत्सव तोंडावर आला आहे, गणपतीबाप्पाच्या आगमनासाठी गावी जाणाऱ्या विशेषतः कोकणवासीयांची लगबग चालू आहे, गणेशोत्सव आणि कोकणवासीयांचे एक भावनिक नाते वेगळेच आहे, कोकणवासीयां बरोबरच राज्यात अनेक ठिकाणी गणेशोत्सव मोठ्या ऊत्साहाने साजरा होतो आणि जो तो आपल्या घरी जाऊ इच्छितो. दरवर्षी कोकणवासीयांना आशा असते ती सुखकारक, किफायतशीर, आणि वेळेत प्रवास होण्याची मात्र दरवर्षी कोकणवासीयांच्या पदरी निराशाच पडते. गेल्या पंधरा सोळा वर्षांपासून मुंबई - गोवा महामार्गाचे रूंदीकरण होता होईना, दरवेळेस कुठे ना कुठे माशी शिंकते आणि काम पूर्ण होत नाही.

आतातर खुद्द रस्ते बांधकाम मंत्री नितिन गडकरी यांनीच हात टेकले आहेत. ९५ टक्के काम पूर्ण झाल्याचे दावे होत असले तरी अनेक ठिकाणी कामे अपूर्ण आहेत म्हणूनच नितीन गडकरी यांनी मी ऊद्घाटनाला जाणार नाही असे जाहीर करून टाकले आहे. याऊलट आता काही ठिकाणी टोल वसुली सुरू करण्यात आली आहे. रेल्वे कितीही अधिकच्या गाड्या सोडण्याचे दावे करत असले तरी एका मिनिटाच्या आत आरक्षण फुल होते आणि लांबलचक वेटिंग लिस्ट लागते. ऐकिकडे ही परिस्थिती तर दुसरीकडे एखाद्या राजकीय नेता, पक्ष यांच्यासाठी मात्र रेल्वे अख्खी रेल्वे ऊपलब्ध होते आणि सोडली जाते हे नेमके काय गौडबंगाल आहे. एसटी देखील शेकडो बसेस सोडते मात्र त्या अपुऱ्या पडतात म्हणून खाजगी ट्रॅव्हल्सने जावे तर खाजगी ट्रॅव्हल्स वाल्यांना तर गणेशोत्सव ही लुटीची पर्वणी ठरते. सरकार, प्रशासन, परिवहन विभाग केवळ कागदी घोडे नाचविते यापलिकडे काही होत नाही.खाजगी ट्रॅव्हल्स चा महागडा प्रवास सुरक्षित होईल याची शाश्वती नाही. काही वर्षांपूर्वी रो रो सेवा सुरू केली होती मात्र खर्चिक आणि लागणारा वेळ यामुळे रो रो सेवेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मुंबई गोवा महामार्गाचे रूंदीकरण कधी होईल हे कुणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही मात्र लवकरच पुर्ण होईल असे दावे-प्रतिदावे सगळेच करतात,त्यावरून तु-तु-मै-मै, राजकारण, आरोप प्रत्यारोप मात्र सगळेच करतात. ऐकूणच या वर्षी देखील कोकणवासीयांचा घरी गणपती बाप्पाचे आगमन खड्डे युक्त रस्तावरूनच होणार आहे.आतातर कुंभमेळा होऊ घातला आहे त्यावेळी वाहतुकीचे नियोजन नेमके कसे असेल?. इंदापूर, माणगाव परिसरात तर आतापासूनच वाहतुक कोंडी होऊ लागली आहे.

ऐकिकडे गणेश भक्तांची ही परिस्थिती तर दुसरीकडे मुंबईची लाइफलाइन आणि लाखो प्रवाशांची जिवनवाहिनी असलेल्या लोकलची परिस्थिती. मुंबईत पश्चिम, मध्य, हार्बर, ट्रान्स हार्बर या चार मार्गावर कसाइ, डहाणू, कर्जत, ऊरण पर्यंत लोकल सेवा चालवली जाते आणि या लोकल मधुन दररोज जवळपास अंशी लाख प्रवासी प्रवास करतात, मात्र कधी रेल्वे सेवा विस्कळीत होते कधी कामांसाठी घोषित अघोषित मेगा ब्लॉक घेतला जातो, कधी



अपघात घडतो त्यामुळे रेल्वे सेवा विस्कळीत होते, मध्य रेल्वेच्या बाबतीत तर रोज मरे त्याला कोण रडे अशीच परिस्थिती आहे. कल्याण पुढील कसारा, आसनगाव, कर्जत, खोपोली या मार्गावर अगोदरच अपुऱ्या लोकल सेवा त्यात गेल्या काही वर्षांपासून साधारण लोकलच्या जागी एसी लोकलचा अट्टाहास, यामुळे नाहक प्रवाशांना वेठीस धरले जाते. गेल्या काही दिवसांपासून टिटवाळा स्थानकात पंधरा डब्यांच्या लोकल ट्रेन साठी प्लॅटफॉर्म रूंदीकरणाचे काम सुरू असल्याने लोकलच्या वेळापत्रकाचा विचकाच झाला आहे. टिटवाळा येथे लोकल ऊभी करण्यास जागा नसल्याने काही लोकल आसनगाव येथे आणुन विशेष लोकल म्हणून सोडल्या जायच्या मात्र काही दिवसांपासून या गाड्या कारशेड रेक म्हणून टिटवाळा पर्यंत नेल्या जातात या सगळ्या गोंधळात प्रवाशांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात न घेता रेल्वे प्रशासन आपला अट्टाहास रेटुन नेत आहे. काही दिवसांपूर्वीच एक महिला दिवा मुंब्रा दरम्यान लोकल मधुन पडली मात्र सुदैवाने वाचली अशा अनेक दुर्घटना आजवर घडल्या आहेत आणि याला कारण म्हणजे प्रवाशांची वाढती संख्या आणि अपुऱ्या लोकल फेऱ्या. त्यातही रेल्वे प्रशासनाकडुन आसनगाव, कसारा या भागातील प्रवाशांना सापत्नभावाची वागणुक दिली जाते, आहे त्या लोकल देखील वेळेवर चालविल्या जात नाही अनेकदा तर लोकल ट्रेन प्लॅटफॉर्म वर ऊभी ठेवुन मेल एक्स्प्रेस गाड्या पुढे काढल्या जातात. गेल्या काही वर्षांपासून तर याचा अतिरेक झाला आहे यामुळे या भागातील प्रवाशांमधे प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे आणि यामुळे त्याचा ऊद्रेक कधीही होऊ शकतो अशी परिस्थिती आहे. याबाबत ना रेल्वे प्रशासन गंभीर आहे ना शासन-प्रशासन, या भागातील लोकप्रतिनिधीं. प्रवाशी, प्रवासी संघटना याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत मात्र रेल्वे प्रशासन काहीच सकारात्मकता दाखवत नाही. या भागातील प्रवाशांनी संयम तरी किती बाळगायचा या संबधितांनी विचार करायला हवा. प्रवाशांच्या संयमाचा ऊद्रेक झाला कि प्रवाशांवरच कारवाईचा बडगा उगारला जातो.या भागातील प्रवाशांची परवड थांबणार तरी कधी?.भागातील प्रवाशांचा संयम सुटत चालला आहे याची वेळीच दखल घेणे गरजेचे आहे. ऐकूणच ऐन सणासुदीला - प्रवाशी वेठीला अशी परिस्थिती आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# ब्रिक्सच्या माध्यमातून भारताचा नवा जागतिक अजेंडा

जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या बदलत्या परिस्थितीत ब्रिक्स या संघटनेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. भारताकडे ब्रिक्सचे नेतृत्व असताना 'रिफॉर्म्स, इनोव्हेशन, कोऑपरेशन अँड सस्टेनेबिलिटी' अर्थात सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार प्रमुख आधारस्तंभांवर भारताने आपला अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भारताची भूमिका केवळ ब्रिक्समधील सदस्य देशाची न राहता विकसनशील आणि उदयोन्मुख राष्ट्रांचा आवाज प्रभावीपणे मांडणाऱ्या देशाची बनत आहे.

ब्रिक्सची सुरुवात ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या चार देशांच्या सहकार्याने झाली. पुढे दक्षिण आफ्रिकेचा समावेश झाला आणि अलीकडील काळात संघटनेचा विस्तारही झाला आहे. जगातील मोठी लोकसंख्या, मोठी बाजारपेठ, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि वाढती आर्थिक क्षमता असलेल्या देशांचा सहभाग ब्रिक्समध्ये असल्याने या संघटनेचे जागतिक महत्त्व मोठे आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत विकसित राष्ट्रांच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करण्याच्या दृष्टीनेही ब्रिक्सकडे पाहिले जाते.

आज जग अनेक संकटांच्या वळणावर उभे आहे. युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अस्थिरता, व्यापारातील संघर्ष, महागाई, ऊर्जा संकट, हवामानबदल, अन्नसुरक्षा आणि तंत्रज्ञानातील स्पर्धा यामुळे अनेक देशांसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा वेळी परस्पर सहकार्य, संवाद आणि सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. ब्रिक्स हे त्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरू शकते.

जागतिक संस्थांमध्ये सुधारणा हा भारताच्या अजेंड्याचा महत्त्वाचा भाग आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांमध्ये विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. जगाची आर्थिक आणि लोकसंख्यात्मक रचना बदलली असताना जुन्या व्यवस्थेत आवश्यक ते बदल होणे गरजेचे आहे. भारताने या सुधारणांसाठी ब्रिक्सच्या माध्यमातून व्यापक सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

नवोन्मेष आणि तंत्रज्ञान हे भविष्यातील विकासाचे प्रमुख आधार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, कृषी, अंतराळ संशोधन आणि नव्या ऊर्जा तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ब्रिक्स देशांनी सहकार्य वाढवले तर त्याचा मोठा फायदा सर्वसामान्य जनतेला होऊ शकतो. भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मिळवलेला अनुभव इतर विकसनशील देशांसाठी उपयुक्त ठरू शकतो.

त्याचबरोबर शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देणे काळाची गरज आहे. आर्थिक विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, पाण्याचे संवर्धन, अन्नसुरक्षा आणि हवामान बदलाचा सामना करणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष न राहता दोन्हींचा समन्वय साधणारे धोरण ब्रिक्सच्या माध्यमातून पुढे नेता येईल.

ब्रिक्स देशांमधील व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढवणे हेदेखील महत्त्वाचे आहे. परस्पर व्यापार वाढला, गुंतवणुकीला चालना मिळाली आणि स्थानिक चलनांमध्ये व्यवहार करण्याच्या पर्यायांवर सहकार्य झाले तर जागतिक आर्थिक व्यवस्थेत या देशांचा प्रभाव वाढू शकतो. मात्र यासाठी परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि संतुलित धोरण आवश्यक आहे.

ब्रिक्ससमोर आव्हानेही कमी नाहीत. सदस्य देशांच्या राजकीय भूमिका, आर्थिक हितसंबंध आणि परराष्ट्र धोरणांमध्ये अनेकदा मतभेद असतात. त्यामुळे सर्व प्रश्नांवर एकमत होणे शक्य नाही. मात्र मतभेद असतानाही सामायिक हिताच्या मुद्द्यांवर सहकार्य करणे हीच ब्रिक्सच्या यशाची खरी कसोटी ठरेल.

भारताने आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून ब्रिक्सला केवळ आर्थिक सहकार्याचे व्यासपीठ न ठेवता सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वत विकासाचा प्रभावी जागतिक मंच बनवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विकसनशील देशांच्या समस्या, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांच्या विकासाचा मुद्दा जागतिक व्यासपीठावर ठामपणे मांडण्याची मोठी संधी भारताला मिळाली आहे.

ब्रिक्सच्या माध्यमातून भारताने जगाला संघर्षाऐवजी सहकार्याचा, वर्चस्वाऐवजी समानतेचा आणि अस्थिरतेऐवजी शाश्वत विकासाचा मार्ग दाखवला, तर भारताचे जागतिक नेतृत्व निश्चितच अधिक भक्कम होईल. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताचा वाढता प्रभाव आणि ब्रिक्सची वाढती व्याप्ती ही देशासाठी निश्चितच आशादायी बाब आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## महत्व

मैत्रीणीकॉन्हेटमधल्या
गावा आल्या सगळ्या
शिवारा सुखे हुंदडल्या
झाल्या मना मोकळ्या

शहरामधले बेगडीपण
गं क्षणार्धात विसरल्या
माखू द्या कपडेधुळीने
गवतातछान पसरल्या

श्वास घ्याया शिकल्या
शुद्ध हवेत शहारल्या
अनवाणी पाय मातीत
फुलकाट्या विहारल्या

जितराब न कुटुंब असे
जाणे ढवळ्यापोवळ्या
ऋण अमूल्य निसर्गाचे
भावले मना कोवळ्या

दूर ठेवी नखरे डायटचे
मनसोक्त पुरणपोळ्या
बैलांना आनंदे भरवता
आणे रंगत बैल पोळ्या

आधुनिक नव शेतकरी
तरीभावना ना वेगळ्या
बैल बंधु साठी भोळ्या
घासअडकला गं गळ्या

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# श्री गणेशाला मॉडेल बनवू नका !

नामंकित कंपन्या आपली उत्पादने खपवण्यासाठी साधारणतः प्रसिद्ध चित्रपट अभिनेता-अभिनेत्री किंवा खेळाडू यांना घेऊन आपल्या उत्पादनांची जाहिरात बनवतात आणि तिचे टीव्ही, वृत्तपत्रे किंवा अन्य प्रसारमाध्यमांतून प्रसारण करतात, त्यासाठी त्यांना लक्षावधी रुपये खर्चही करावे करतात.

गणेशोत्सव काळात मात्र काहीजण थेट श्री गणेशालाच मॉडेल बनवून आपल्या उत्पादनांची जाहिरात करत असल्याचे गेल्या काही वर्षांमध्ये लक्षात आले आहे. गणेशोत्सवादरम्यान टीव्ही, वृत्तपत्रे, रस्त्यांवरील होर्डिंग्स यांवर झळकणाऱ्या उत्पादनांच्या आणि आस्थापनांच्या जाहिरातींमध्ये श्री गणेशाच्या चित्रांचा सर्रासपणे वापर केला जातो. या दिवसांमध्ये वातावरण गणेशमय असल्याने तसे होणे स्वाभाविक आहे; मात्र काही आस्थापने आपली उत्पादने खपवण्यासाठी श्री गणेशाच्या चित्रांचा आणि ॲनिमेटेड चलचित्रांचा एखाद्या मॉडेलप्रमाणे वापर करताना दिसतात. श्री गणेशाच्या हातामध्ये सदर उत्पादने देऊन किंवा श्री गणेश त्या उत्पादनाच्या चित्राकडे बोट दर्शवून ते घेण्यास प्रवृत्त करत असल्याचे दाखवले जाते. काही जाहिरातींमध्ये तर श्री गणेशाच्या तोंडी ते उत्पादन घेण्याविषयीचे संवाद टाकले जातात. श्री गणेश हे समस्त भक्तांचे श्रद्धास्थान आहे, कोणा आस्थापनांचे उत्पादन खपवणारे मॉडेल नव्हे, आपल्या लाभासाठी श्री गणेशाचा अशा प्रकारे वापर करणे ही एकप्रकारे गणरायाची अवहेलनाच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या जाहिराती कुठे आढळल्यास गणेश भक्तांनी या आस्थापनांना जाब विचारायला हवा.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**



This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### आडगाव बाजार येथे बैलांचे लग्न लावून उत्साहात बैलपोळा साजरा

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१०, जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील आडगाव बाजार येथे शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आणि कृषी संस्कृतीचे प्रतीक असलेला बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातील वेशीवर बैलांचे विधिवत लग्न लावण्यात आले. त्यानंतर सजवलेल्या बैलांची बँड-ताशांच्या गजरात गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.आडगाव बाजार परिसरात मागील महिनाभरापासून पावसाचा मोठा खंड पडला आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला असून अनेक पिके पाण्याअभावी होरपळून जळून खाक झाली आहेत.

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम संकटात सापडला असला तरी, आगामी काळात चांगला पाऊस पडेल आणि रब्बी हंगामाला तरी चांगली साथ मिळेल, या आशेची किरण शेतकरी वर्गाने अद्याप सोडलेली नाही.दरम्यान, वर्षभर शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून शेतीची कामे करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा सणाला विशेष महत्त्व आहे. याच भावनेतून आडगाव बाजार येथील शेतकऱ्यांनी यावर्षीही बैलपोळा उत्साहात साजरा केला.बैलांना रंगीबेरंगी सजावट करण्यात आली होती. त्यांच्या शिंगांना रंग लावून, अंगावर आकर्षक झूल व सजावटीचे साहित्य परिधान करून त्यांना सजविण्यात आले. गावातील वेशीवर पारंपरिक पद्धतीने बैलांचे लग्न लावण्यात आले. यावेळी गावातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यानंतर बँड-ताशांच्या गजरात आणि वाजतगाजत सजवलेल्या बैलांची मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या सार्वजनिक बैलपोळा सोहळ्यात आडगाव बाजार परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषा, सजवलेले बैल आणि मिरवणुकीमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

पावसाच्या खंडामुळे शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले असले तरी, बळीराजाची आशा आणि आपल्या पशुधनाविषयीची कृतज्ञता या सणाच्या माध्यमातून पुन्हा एकदा दिसून आली. संकटाच्या काळातही शेतकऱ्यांनी परंपरा आणि कृषी संस्कृती जपण्याचे काम केले आहे.

### खापरखेड्याच्या मुख्य मार्गावर पोळ्याचा जल्लोष



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** शेतकऱ्याचा जिवाभावाचा साथीदार असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा सण खापरखेडा येथे गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळच्या सुमारास मुख्य मार्गावर सजवलेल्या बैलजोड्या दाखल झाल्याने परिसराला जणू पारंपरिक उत्सवाचे स्वरूप आले होते.

शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना स्वच्छ आंघोळ घालून रंगीबेरंगी झुली, गोंडे, घंटा तसेच विविध अलंकारांनी सजविले होते. काही बैलांच्या शिंगांना आकर्षक रंग देण्यात आले होते. सजलेल्या बैलजोड्या पाहण्यासाठी मुख्य मार्गावर नागरिकांची गर्दी झाली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकांनी या पारंपरिक सोहळ्याचा आनंद घेतला. वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याला साथ देणाऱ्या बैलाची पूजा करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा पोळ्याच्या माध्यमातून जपली जाते. आधुनिक युगात शेतीच्या पद्धती बदलत असल्या तरी पोळ्याच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृती आणि शेतकरी जीवनाशी जोडलेली परंपरा आजही कायम असल्याचे यावेळी दिसून आले. मुख्य मार्गावर सजलेल्या बैलजोड्या आणि त्यांना पाहण्यासाठी जमलेली नागरिकांची गर्दी यामुळे खापरखेड्यात पोळ्याचा उत्साह शिगेला पोहोचला होता. पारंपरिक वेशभूषा, बैलांची आकर्षक सजावट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे पोळा सणाची रंगत आणखी वाढली.

### दिव्यात घरफोडी करून सोन्याचे दागिने लांबवणारे जेरबंद

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.११, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरात घरफोडी करून सोन्याचे दागिने पळवणाऱ्या टोळीचा मुंब्रा पोलिसांच्या दिवा तपास पथकाने अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश केला आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी तीन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून तब्बल ६ लाख ५२ हजार ५०० रुपये मूल्याची ४४.५६० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

मुलीच्या ओळखीचा फायदा घेत चोरी ७ सप्टेंबर २०२६ रोजी दिवा पूर्व येथील रहिवासी संतोष जाधव यांच्या बंद घराचा फायदा घेत चोरट्याने ४५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र लांबवले होते.

याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली. तपासात फिर्यादीच्या मुलीशी ओळख असलेल्या अनमोल श्रीवास्तव (१८) यानेच घरफोडी केल्याचे उघड झाले. चोरीचा हा ऐवज त्याने मित्र अक्षय कदम (२३) याच्याकडे विक्रीसाठी सोपवला होता.

दागिने वितळवून बनवली सोन्याची लगड अक्षय कदम याने पैशांची गरज असल्याचे भासवून कोणत्याही पावतीशिवाय हे मंगळसूत्र मालाड येथील 'निर्मॉई ज्वेलर्स'चा मालक सुदीप सामंता (२४) याला विकले. सुदीपने तात्काळ ते सोन्याचे दागिने वितळवून त्याची लगड तयार केली. मात्र, पोलिसांनी कौशल्याने सुगावा लावत अनमोल, अक्षय आणि सोनार सुदीप या तिघांनाही ताब्यात घेतले आणि चोरी गेलेला पूर्ण ऐवज सोन्याच्या लगडीच्या रूपात जप्त केला.

नागरिकांना सुरक्षिततेचे आवाहन

वरिष्ठ पोलीस मा. गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलिसांच्या तपास पथकाने ही धडक कारवाई केली. या यशस्वी कारवाईनंतर पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. घरात अनोळखी व्यक्ती किंवा कामगारांना एकटे सोडू नये, बाहेरगावी जाताना मौल्यवान ऐवज अथवा मोठी रोकड घरात ठेवू नये आणि घराची चावी केवळ विश्वासातील व्यक्तीकडेच द्यावी, असे आवाहन मुंब्रा पोलिसांनी केले आहे.

## पोलीस उपनिरीक्षकाची संधी सोडून निवडला शिक्षकी पेशा!

पोलीस उपनिरीक्षकाची संधी सोडून निवडला शिक्षकी पेशा!

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, सातारा :** आयुष्यात अनेकदा आपल्या समोर दोन वेगवेगळ्या वाटा उभ्या राहतात. एक वाट प्रतिष्ठा, अधिकार आणि आकर्षक कारकीर्दीकडे घेऊन जाणारी असते, तर दुसरी वाट समाज घडविण्याच्या ध्येयाकडे घेऊन जाते. अशाच एका निर्णायक वळणावर सुनिता कामटे - जुनघरे यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाची संधी सोडून शिक्षकी पेशाची वाट निवडली आणि आज त्याच समर्पित सेवेला जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.सावली गावची माहेरवाशीण व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डेरेवाडीच्या शिक्षिका सुनिता कामटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून पोलीस उपनिरीक्षक पदासाठी नियुक्ती झाली होती. त्याच काळात त्या शिक्षक म्हणूनही नोकरी करत होत्या . दोन्ही क्षेत्रांतील करिअरची दारे खुली असताना त्यांनी कोणताही संभ्रम न ठेवता विद्यार्थ्यांना घडविण्याचा मार्ग स्वीकारला. स्वत: अधिकारी न होता अनेक अधिकारी व भविष्यातील अनेक यशस्वी पिढ्या घडविणारा शिक्षक होणे अधिक महत्त्वाचे, या भावनेतून त्यांनी शिक्षकी पेशाला आपल्या जीवनाचे ध्येय बनविले.

गेल्या अनेक वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा देणे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे त्यांचे आणि विद्यार्थ्यांचे नाते केवळ शिक्षक-विद्यार्थी एवढ्यापुरते मर्यादित न राहता जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे नाते बनले.

त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना सन



२०२६- २७ चा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या अनेक वर्षांच्या निस्वार्थ आणि समर्पित शैक्षणिक सेवेची पावतीच मानली जात आहे.

पुरस्काराबाबत आपल्या भावना व्यक्त करताना सुनिता कामटे - जुनघरे यांनी अत्यंत नम्रपणे सांगितले की,

आज मिळालेला हा सन्मान माझा नसून माझ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे. माझ्या विद्यार्थ्यांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि त्यांच्या यशातून मिळणारे समाधान हीच माझ्या शिक्षक जीवनाची खरी कमाई आहे. त्यामुळे हा पुरस्कार मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना समर्पित करते.

पोलीस उपनिरीक्षक पदासारखी प्रतिष्ठेची संधी सोडून ज्ञानदानाचा आणि समाज घडविण्याचा मार्ग स्वीकारणाऱ्या सुनिता जुनघरे-कामटे यांचा हा प्रवास आजच्या पिढीतील शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कार्याचा झालेला जिल्हास्तरीय गौरव हा केवळ एका शिक्षिकेचा सन्मान नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणाऱ्या संपूर्ण शिक्षकवृत्तीचा गौरव आहे.

## सरकारच्या आश्वासन पूर्तीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.११, उदगीर (लातुर) :** उदगीर महाराष्ट्र शासन सर्वच आघाड्यावर अपयशी ठरले असून दिलेली आश्वासने पाळली जात नाहीत. विकासाचा दर केवळ दीड टक्क्यावर येऊन पोहोचला आहे. कित्येक विकास कामे अर्धवट राहिले आहेत. या सर्व गोष्टीची जाणीव सरकारला करून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलनात्मक पवित्रा घेण्यात आला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, शिवसेने नेते महाराष्ट्र राज्याचे विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आ. अंबादासजी दानवे यांच्या संकल्पनेतून व शिवसेना लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, शिवसेना लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांच्या सूचनेनुसार उदगीर तहसील कार्यालय येथे निवेदन सादर करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सप्टेंबर २०१६ मध्ये अनेक योजनांची बरसात केली होती.

त्याच पद्धतीने १६ सप्टेंबर २०२३ रोजी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना उदगीर तालुक्यातील विविध प्रकारच्या विकास कामांच्या पोकळ वल्गना केल्या होत्या. त्या योजना आजपर्यंत कार्यान्वित करण्यात आल्या नाहीत. उदगीर तालुक्यातील खाजगी उदयगिरी




औद्योगिक वसाहत येथे पाणीपुरवठा नाही, या वसाहतीसाठी स्वतंत्र वीजपुरवठा केला गेला नाही. तसेच शेतकरी बांधवांना तात्काळ पिक विमा मंजूर करून द्यावा.

शेतकरी बांधवांना संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा. कोरडा दुष्काळ जाहीर करावा.२०२५ मध्ये अतिवृष्टी झाल्याचे घोषित केले पण शेतकरी बांधवांना एक रुपयाही मिळाला नाही. उदगीर तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्ते पूर्ण कधी होणार? हा प्रश्न गंभीर आहे. या विधानसभा मतदारसंघात जलजीवन मिशन चे काम अर्धवट राहिलेले आहे. कित्येक कामे हे बंद पडली आहेत.

तसेच उदगीरचे नाट्यगृह आणि भुयारी गटार योजनेतील भ्रष्टाचार थांबला पाहिजे. शेतकरी बांधवांच्या उसाला तीन हजार रुपये भाव मिळाला पाहिजे. यासाठी व महायुतीच्या सरकारने जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी आता हे सरकार करू शकणार नाही म्हणून महायुतीचे सरकारच्या विरोधामध्ये तुमसी ना हो पायेगा हे आंदोलन सुरू करण्यात आले असून, त्या अनुषंगाने रीतसर निवेदन व धरणे आंदोलन शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली व विधानसभा प्रमुख स्वप्नील अण्णा जाधव, उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, तालुकाप्रमुख प्रशांत मोरे, शहर प्रमुख बालाजी सोनाळे, विधानसभा समन्वयक व्यंकट साबणे, उप तालुका प्रमुख महेश फुले, युवा सेना जिल्हा सरचिटणीस रमण माने, युवा सेना चंद्रकांत सांगळे, महिला आघाडीच्या अरुणाताई लेंडाने, शिवकांत चटनाळे, शिवा मोरारीकर, मुन्ना पांचाळ, मनोज फुले, शहर संघटक महेश येरकुंडे, अनिकेत काळेगोरे, सरोजा बिरादार, सुनिता वाघमारे, गंगुबाई कंजे, प्रेमिला जाधव, प्रतिभा जाधव, मीराताई कांबळे, अर्चना सोनकांबळे ,श्वेता गायकवाड ,मंगलाताई घोगरे यांच्यासह अनेक शिवसैनिक या प्रसंगी उपस्थित होते.

सरकारने आपल्या आश्वासनाची पूर्तता नाही केल्यास नाईलाज म्हणून शिवसेनेला आपल्या स्टाईल आंदोलन करावे लागेल असा इशाराही याप्रसंगी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना शिवसेनेचे उदगीर जळकोट विधानसभा प्रमुख स्वप्निल अण्णा जाधव यांनी दिला आहे.

## कुंडलवाडीत शांतता समितीच्या बैठकीत उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.११, कुंडलवाडी :** कुंडलवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने आगामी बैलपोळा आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्याच्या आवारात शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कुंडलवाडी हे गाव पारंपरिक वारसा लाभलेले आणि उत्सवप्रिय लोक असणारे गाव आहे. येथील नागरिक नेहमीच शांतताप्रिय वातावरणात सर्व सण-उत्सव एकत्र येऊन साजरे करतात. याच बंधुभाव आणि एकोप्याची परंपरा यंदाही जपण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार गजानन शिंदे, कुंडलवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार, माजी उपाध्यक्ष शैलेश ऱ्याकावार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, अभियंता सुरेश गट्टूवार, पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष दत्ता हमंद, पत्रकार अफझल शेख आणि पोलीस पाटील साहेबराव डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी गावातील सर्व गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पोलीस पाटील, पोलीस प्रशासन, नगरसेवक, व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी केले.

पारंपरिक वाद्यांना प्राधान्य अन् डीजेवर पूर्ण बंदी बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, तहसीलदार गजानन शिंदे आणि नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कुंडलवाडीच्या सांस्कृतिक वारशाचा उल्लेख करत सणांमध्ये डीजेचा वापर पूर्णपणे बंद ठेवून ढोल-ताशा यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या गजरात उत्सव साजरा करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. उत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड देत, गावातील प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या परिसरातील किंवा शाळेतील किमान पाच गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा खर्च किंवा शैक्षणिक मदत करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

जवळपासच्या परिसरात 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबवली जात असली, तरी कुंडलवाडी व

### डीजेमुक्त व पारंपरिक वाद्यांना पसंती




परिसरातील गावात यावर्षी एकूण ८१ गणेश मंडळांची स्थापना केली जात आहे. या सर्व मंडळांमध्ये सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. त्यानुसार दर चार गणेश मंडळांमागे कुंडलवाडी पोलीस स्टेशनचा एक पोलीस कर्मचारी तैनात असणार आहे. गावात सणांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर ४२ गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तडीपार व्यक्तींना सणाच्या कालावधीत गावाबाहेर ठेवण्यात येत आहे. याशिवाय गावातील अवैध दारू, गुटखा, मटका आणि शिंदी यासारख्या अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी, गणेश मंडळांनी आणि व्यापाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुरेख सुंदर सूत्रसंचालन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर यांनी केले.

# लीज डीडच्या प्रतीसाठी नोंदणीला अडथळा? नेरूळ उपनिबंधकांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांचा सवाल

**अक्षराज : विनोद धुरंधर**
**दि.१०, नेरूळ (नवी मुंबई) :** नेरूळ रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील टेलिफोन एक्सचेंजच्या इमारतीमध्ये विविध दस्तऐवजांचे रजिस्ट्रेशन केले जाते. मात्र, येथील उपनिबंधकांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात असून, दस्त नोंदणीच्या वेळी लीज डीडची प्रत मागितली जात असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची चर्चा आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एखाद्या रूमच्या रजिस्ट्रेशनसाठी संबंधित प्लॉटच्या लीज डीडची प्रत दस्तासोबत जोडणे आवश्यक असल्याचे उपनिबंधकांकडून सांगितले जाते. सदर प्रत उपलब्ध नसल्यास रजिस्ट्रेशन करण्यास मनाई केली जाते. त्यामुळे रजिस्ट्रेशनसाठी आलेले दोन्ही पक्षकार, वकील तसेच साक्षीदार यांना वेळ आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांचा दावा आहे की, संबंधित बांधकामाला उउ किंवा जउ उपलब्ध असल्यास त्यासंदर्भातील कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणीची प्रक्रिया केली जाते. त्यामुळे लीज डीडची प्रत प्रत्येक वेळी मागणे कितपत आवश्यक आहे, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याबाबत शासनाच्या नियमांनुसार नेमकी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याची स्पष्ट माहिती नागरिकांना देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे शासनाच्या नियम ानुसारच मागवावीत. अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून नागरिकांना हेलपाटे मारायला लावू नयेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सदर उपनिबंधकांच्या कार्यपद्धतीची संबंधित विभागाने खाते निहाय चौकशी करून वस्तुस्थिती तपासावी, तसेच नागरिकांना कोणत्याही प्रकारचा अनावश्यक त्रास होत आहे का, याची शहानिशा करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आवश्यकता असल्यास संबंधित अधिकाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देऊन नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

वाशी आणि कोपरखैरणे येथील नोंदणी कार्यालयांमध्ये अशा प्रकारची अडचण येत नसल्याचे काही नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नेरूळ येथील नोंदणी कार्यालयातील कार्यपद्धतीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

# पारनेर तालुका भीषण दुष्काळाच्या उंबरठ्यावर : बाबासाहेब तरटे

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात यंदा अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने पारनेर तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पेरणी झालेली बाजरी, सोयाबीन, मका तसेच चारा पिके पाण्याअभावी करपू लागली असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. विहिरी, बंधारे आणि इतर जलस्रोतांची पाणीपातळी झपाट्याने खालावत असल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे संकटही गंभीर होण्याची शक्यता आहे.

पिके हातातून जाण्याची भीती निम ाण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, शेतीवर अवलंबून असलेल्या मजुरांच्या रोजगारावरही त्याचा परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तालुक्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा बाजार समि तीचे संचालक बाबासाहेब तरटे यांनी केली आहे. महसूल प्रशासनाने टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, पाडळी, कान्हूर यांसह पाणीटंचाईग्रस्त २० ते २५ गावांमध्ये तातडीने टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करावा. तसेच पावसाअभावी जळालेल्या व करपलेल्या पिकांचे कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये पीक



नुकसानभरपाई द्यावी. पीक विम्याची आगाऊ रक्कमही तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतीची कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागातील मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे गावोगावी मनरेगा अंतर्गत पाझर तलाव दुरुस्ती, शेतरस्ते, जलसंधारण आदी कामे मोठ्या प्रम ाणावर सुरू करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा.

तालुक्यात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासकीय चारा डेपो सुरू करावेत. पशुधनासाठी पुरेसे पाणी व चारा उपलब्ध करून द्यावा अशीही मागणी तरटे यांनी केली. सरकारने तातडीने मागण्या मान्य करून योग्य ती कारवाई न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही बाबासाहेब तरटे यांनी दिला आहे.

# शेतकऱ्यांच्या जीवनात बैलपोळ्याचे मोठे महत्त्व - रविंद्र राजदेव



बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या भावनेशी जोडलेला सण आहे. शेतकरी आपल्या बैलाला पोटच्या मुलाप्रमाणे जपतो. यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट आले आहे. शासनाने तातडीने परिस्थितीची पाहणी करून जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करावी. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दुष्काळ जाहीर करण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना मदत करावी. या कठीण काळात मी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. जर शासनाने लवकरात लवकर शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकट परिस्थितीची पाहणी करून योग्य निर्णय घेतला नाही तर सर्व शेतकऱ्यांना घेऊन गुरा-ढोरासहित तहसील कार्यालयात आंदोलन करू.

**– रविंद्र राजदेव**
**नेते, टाकळी ढोकेश्वर जि.प. गट**

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकऱ्यांच्या सोबत अहोरात्र शेतात राबून मातीला सोनं बनवणारा बैल हा त्यांच्या कष्टाचा खरा साथीदार असतो. शेतकऱ्यांचे पशुधन हे त्याचे सर्वस्व असते. पशुधनावर प्रेम करणारा शेतकरी हा सर्वांचा पोशिंदा असून त्याच्या जीवनामध्ये बैलपोळ्याचे महत्त्व मोठे असल्याचे गौरवोद्गार निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी काढले.

यंदाचा पावसाळा सुरू होऊन दोन महिने उलटले तरी पारनेर तालुक्यात समाधानकारक पाऊस झालेला नाही. दग दाटून येतात पण बरसत नाहीत, अशी परिस्थिती आहे. पिके करपून जात असल्याने सर्वत्र चांगला पाऊस पडून तालुक्यातील शेतकरी आनंदी व सुखी होऊ दे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा सण असलेला श्रावणी बैलपोळा टाकळी ढोकेश्वर गटातसह नांदूर पठार येथे पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र पावसाने अचानक दडी मारल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता आणि नाराजीचे वातावरण पाहायला मिळाले.

सोयाबीन हे प्रमुख पीक असून त्यासोबत बाजरी, मूग, वाल आदी पिकांची पेरणी करण्यात आली आहे. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. पेरणीसाठी अनेक शेतकऱ्यांनी उसनवारी करून पैसे उभे केले आहेत. आता पाऊसच झाला नाही, तर घेतलेले पैसे कसे फेडायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

जो बैल वर्षभर काबाडकष्ट करतो, त्याला आम्ही पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळतो. त्यामुळे त्याचा सण आम्ही साजरा करणारच; मात्र निसर्गाने साथ दिली नाही तर शेतकऱ्याचे पुढे काय होणार, याची चिंता आहे, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांच्यासह शेतकरी सखाराम आग्रे, विठ्ठल आग्रे, प्रकाश राजदेव, नवनाथ पाटील घोलप, योगेश जाधव, नारायण राजदेव, नारायण चौधरी, अरुण आग्रे, गणेश देशमाने, भास्कर चौधरी, बाळू भांबरे, शंकर आग्रे, मुरलीधर उमप, गंगाधर आग्रे, आकाश म हाराज घोलप, बाबाजी देशमाने, भानुदास आग्रे, सोपान राजदेव, पोपट राजदेव, अमोल गाडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# 'रयत इंग्लिश मीडियम स्कूल'ला आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ' प्रमाणपत्र प्रदान

**अक्षराज : स्वप्निल जावळे**
**दि.११, शिरवळ :** शिक्षण क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या, रयत इंग्लिश मीडियम स्कूल (शिरवळ) या शाळेला आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'आयएसओ' (ISO 9001:2015) प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. ९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या भव्य समारंभात आंतरराष्ट्रीय मानकीकरण संस्थेचे प्रम ुख महेश सोनार यांच्या हस्ते शाळेला हे प्रतिष्ठित प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. शाळेतील दर्जेदार शिक्षण, उत्कृष्ट पायाभूत सुविधा आणि आदर्श व्यवस्थापन यांवर या मानांकनामुळे शिक्कामोर्तब झाले असून, शिरवळ परिसराच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, प्रशासकीय पारदर्शकता, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि पालकांचे सम ाधान या सर्व निकषांवर आधारित कठोर आंतरराष्ट्रीय ऑडिट यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या सोहळ्याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख, पंचायत समिती खंडाळाच्या सभापती छायाताई जाधव, शिरवळचे सरपंच रविराज दुधगावकर आणि उपसरपंच राहुल तांबे यांची प्रम ुख उपस्थिती होती. तसेच श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, आदर्श विद्यालय, शिरवळचे मुख्याध्यापक विकास गायकवाड, शाळेच्या समन्वयक सौ. घाडगे मॅडम आणि मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील



मान्यवर, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या ऐतिहासिक यशाबद्दल आनंद व्यक्त करताना शाळेच्या मुख्याध्यापिका व समन्वयक म्हणाल्या, हा बहुमान म्हणजे रयत माऊलींच्या प्रेरणेने संस्थेने जोपासलेल्या शैक्षणिक मूल्यांचा आणि संपूर्ण शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सांघिक परिश्रमाचा परिपाक आहे. या मानांकनामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण देण्याची आम ची जबाबदारी वाढली आहे.

यासाठी आदर्श विद्यालय शिरवळ शाखेचे मुख्याध्यापक विकास गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन शाळेस लाभले. त्यांनी यासाठी शाळेतील शिक्षक वृंद तसेच विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## थोडक्यात बातम्या

### गणेशोत्सवासाठी महिलांनी साकारलेल्या मूर्तींची विक्री सुरू...



**अक्षराज : पुनम परदेशी**
**दि.११, सोयगाव :** गणेशोत्सवानिमित्त आमखेडा येथील पूर्णिमा महिला बचत गट व उमेद अभियानांतर्गत महिलांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींच्या विक्री केंद्राचे सोयगाव बसस्थानकासमोर उद्घाटन करण्यात आले. गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांच्या हस्ते या विक्री केंद्राचे उद्घाटन झाले.

महिलांनी स्वतःच्या कौशल्यातून तयार केलेल्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्याने त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्याबरोबरच बचत गटाच्या माध्यम ातून रोजगारनिर्मितीलाही चालना मिळणार आहे. गणेशभक्तांनी या मूर्ती खरेदी करून महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी अशोक दौड, ऋषिकेश देशमुख, विष्णू मापारी, सीता मापारी, सोनाली मोरे यांच्यासह महिला बचत गटाच्या सदस्या उपस्थित होत्या.

### खा. प्रतिभा धानोरकर यांच्या नेतृत्वात वरोरा बाजार समितीत सत्तांतर




**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.११, चंद्रपूर :** वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीम ध्ये सहकार क्षेत्रातील अतंत म हत्वाची आणि राजकीयदृष्ट्या वादळी ठरलेली घडामोड पाप पडली असून, विद्यमान सभापती डॉ.विजय देवतळे यांच्याविरोधात आणलेला अविश्वास प्रस्ताव १२ विरुद्ध ५ मतांच्या प्रचंड बहुमताने मंजूर करण्यात आला.

खा. प्रतिभा धानोरकर यांच्या आक्रमक नेतृत्वापुढे विरोधक निष्प्रभ ठरले असून आमदारांना जोरदार धोबीपछाड देत खासदार धानोरकर यांच्या नेतृत्वाचा डंका पुन्हा अकदा वाजला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे बाजार समितीतील डॉ. देवतळे यांची सत्ता संपुष्टात आली असून, तालुक्याच्या सहकार क्षेत्रात खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गटाने आपले वर्चस्व पूर्णपणे सिध्द केले आहे. गेल्या काही काळापासून बाजार समितीच्या कारभारावर आणि धोरणांवर बहुसंख्य संचालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला होता.

सभापतींच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्याच्या उद्देशाने संचालकांनी अविश्वास प्रस्तावाची मागणी केली होती. त्यानुसार पार पडलेल्या विशेष बैठकीत एकूण १७ संचालकांपैकी १२ संचालकांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान करत विरोधकांना जोरदार दणका दिला, तर केवळ ५ संचालकांना प्रस्तावाच्या विरोधात मतदान करता आले. बहुमताचा हा स्पष्ट कौल डॉ. देवतळे यांच्या कारभाराविरोधातील संचालकांचा तीव्र रोष आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या नेतृत्वावरील ठाम विश्वास दर्शविणारा ठरला आहे.। सत्तांतरावर आणि दणदणीत विजयावर प्रतिक्रिया देताना खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकरी, अडते व व्यापाऱ्यांच्या विश्वासाचे केंद्र असते. तिथे पारदर्शकता आणि शेतकरीहित सर्वो च्च राहिले पाहिजे. मागील काही काळापासून संचालकांचा आणि शेतकऱ्यांचा विश्वास गमावलेल्या नेतृत्वाला हटवून बाजार समितीत लोकशाही मार्गाने नवीन पर्व सुरु करण्यात आले आहे.

### मुक्रमाबादेत शांतता समितीची बैठक संपन्न



**अक्षराज : अशोक लोणीकर**
**दि.११, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी शांतता समितीची बैठक घेण्यात आली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट हे होते. यावेळी पोलीस ठाण्याचे प्रभारी राजू चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक शंकर मोरे, संपूर्ण पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान व महिला कर्मचारी, तसेच पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील, गणपती मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डीवायएसपी किरण पोपळघट म्हणाले की, गणेशोत्सव हा उत्सव सर्वांनी शांततेत व एकोप्याने साजरा करावा. मिरवणुकीदरम्यान डीजे मुक्त ठेवून पारंपरिक वाद्यांचाच वापर करावा, वेळेचे बंधन पाळावे. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये. कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

गणेश मंडळांनी आवश्यक परवानग्या घ्याव्यात, नियमांचे पालन करावे, गावात शांतता व सलोखा राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी गणेशोत्सव डीजे मुक्त करण्याचे व शांतता राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.